क्र.पोमसं/३१/३९-१/ऑनलाईन-घबांअ/गहाणखत/१८/२०२३ मुंबई, दि. ०८/०२/२०२३

**संदर्भ:-** या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/१७/२०१८, दि.०७/०४/२०१८

**विषय :-** राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / अंमलदार यांच्या घरबांधणी अग्रिमाबाबत.

*****

**परिपत्रक**

संदर्भाधीन परिपत्राकामधील मुद्दा क्र.३(१०) मध्ये असे नमूद केले आहे की, "ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात येते, त्यांचे घर खरेदीबाबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे/ विमापत्रे/ गहाणखत विहित मुदतीत संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याची व ताब्यात ठेवण्याची संपूर्णत: जबाबदारी घटक कार्यालय/ विभाग प्रमुख यांची राहील."

परंतु असे निदर्शनास आले आहे की, पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना घर बांधणी अग्रिम मंजूर करण्यात आलेले आहे. त्यांनी घर खरेदीबाबत आवश्यक असलेली कागदपत्रे/ विमापत्रे/ गहाणखत कार्यालयात सादर केलेले नाहीत. त्याअनुषंगाने नमुद करण्यात येते की, म.शासन वित्त विभाग शा.नि.क्र.-घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/विनियम, दि.०२/०२/२०२१ मधील मुद्दा क्र.७(१४) मध्ये असे नमूद आहे की, "शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेले अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे, त्या कारणाकरीता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसुरदाराकडून अग्रिमाची रक्कम, प्रचलित व्याजदर + २.७५ टक्के दंडनीय व्याज यासह एकरकमी वसूल करण्यात यावी."

तरी, सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, घरबांधणी अग्रिमबाबत सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधीत घटक कार्यालयाची आहे. ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना बँका मार्फत घर बांधणी अग्रिम मंजूर करण्यात आलेले आहे, त्यांनी घर खरेदीबाबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे/ विमापत्रे/ गहाणखत कार्यालयात सादर केले आहे किंवा कसे? याबाबतची माहिती खालील प्रमाणे या कार्यालयास तात्काळ पाठवावी.

| अ.क्र. | नाव | अग्रिम मंजूरीचा दिनांक | घराचे गहाणखत व विमा घेण्यात आला आहे का? | घराचे गहाणखत व विमा घेण्यात आला नसल्यास त्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |

( अनुप कुमार सिंह)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, म.राज्य मुंबई यांचे कार्यालय

प्रति,
पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म. राज्य, मुंबई



Scanned by Scanner Go

पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म. राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त,(रेल्वेसह) (बृहन्मुंबई वगळून)
अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश विभाग, पुणे/वाहतूक, मुंबई/ रा.रा.पो.बल. मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ दहशतवाद विरोधी पथक म.राज्य मुंबई/ फार्सवन, म.राज्य, मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
संचालक, न्याय सहायक वैद्यकीय प्रयोगशाळा, नाशिक/ पुणे/ कोल्हापूर/ नांदेड/ औरंगाबाद/ नागपूर/ अमरावती
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर/विशेष सुरक्षा विभाग, दादर/ नागरी हक्क संरक्षण, मुंबई /मोटार परिवहन,पुणे/रा.रा.पो.बल नागपूर/पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे/पूर्व विभाग, नागपूर/विशेष कृती दल नागपूर/नागरी दहशतवाद विरोधी प्रशिक्षण केंद्र, गोरेगांव, मुंबई/ अंगुली मुद्रांक, मुंबई
उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे /अ.अ.प्र.के., नागपूर
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १९/राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर/ धुळे
अपर उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोंकण, नवी मुंबई / पुणे / कोल्हापूर / औरंगाबाद / नांदेड / नागपूर / नाशिक /अमरावती/ ठाणे
पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे / अमरावती / नागपूर / औरंगाबाद/कोंकण भवन, नवी मुंबई/नाशिक / कोल्हापूर



Scanned by Scanner Go